ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**नाशिक– ४२२ २२२**

**नॅक मानांकित 'ए' श्रेणी**

Website : ycmou.ac.in

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

## शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम माहितीपुस्तिका (P-10)

**शैक्षणिक वर्ष : 2023–2024**

# Contents

**१. विद्याशाखेचा परिचय ........ ३**

**२. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम ........ ३**

२.१ शिक्षणक्रमाची संरचना ........ ३
२.२ अध्ययन पद्धती ........ ४
२.३ प्रवेश पात्रता ........ ४
२.४ शिक्षणक्रम शुल्क ........ ४
२.५ कालावधी ........ ५
२.६ माध्यम ........ ५
२.७ मूल्यमापन प्रक्रिया ........ ५
२.८ Academic Bank of Credits-ID तयार करण्याची सूचना ........ ५

**३. विभागीय केंद्रे ........ ६**

**४. संपर्कासाठी पत्ते ........ ६**

**५. परिशिष्टे ........ ७**

परिशिष्ट ५.१ : University Grants Commission Resolution (2004) ........ ७
परिशिष्ट ५.२ : मुख्याध्यापक व उप मुख्याध्यापक पदावरील पदोन्नतीसाठी महाराष्ट्र शासन निर्णय (२००५) ........ ८
परिशिष्ट ५.३ : मुख्याध्यापक व उप मुख्याध्यापक पदावरील पदोन्नतीसाठी महाराष्ट्र शासन निर्णय (२००८) ........ ९
परिशिष्ट ५.४ : मुक्त विद्यापीठाच्या पदवी/पदविकांना महाराष्ट्र शासन मान्यता ........ १०

## १. विद्याशाखेचा परिचय

विद्यापीठात एकूण आठ विद्याशाखा आहेत. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षात शिक्षणशास्त्र विद्याशाखेची स्थापना झाली. त्यानंतर शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपले नाव संपूर्ण महाराष्ट्रात उज्ज्वल करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली. आज संपूर्ण महाराष्ट्र शिक्षणशास्त्र विद्याशाखेकडे नेतृत्वाच्या दृष्टीने पाहतो. अद्ययावतता, गतिमानता आणि नवोपक्रमांचे स्वागत ही या विद्याशाखेची वैशिष्ट्ये.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपल्या कार्यास सुनिश्चितरित्या आणि गुणवत्ता राहावी या दृष्टीने विद्याशाखेचे गुणवत्ता धोरण, व्रतविधान आणि उद्दिष्टे निश्चित केली. त्या अनुषंगाने विद्याशाखेत प्रमाणपत्रापासून संशोधनापर्यंत अनेक शिक्षणक्रम टप्प्या–टप्प्याने सुरू झाले. विद्याशाखेच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षात (१९९१) दूरशिक्षणाद्वारे बी. एड. शिक्षणक्रम सुरू करणारे संपूर्ण भारतातील हे पहिले मुक्त विद्यापीठ होय. त्यानंतर ह्या विद्याशाखेने अवघ्या दहा–पंधरा वर्षांत एम. फिल. शिक्षणशास्त्र (२००७), एम. फिल. शारीरिक शिक्षण (२००७), एम. एड. (१९९४), एम. ए. शिक्षणशास्त्र (२००७) असे उच्च पदवी शिक्षणक्रम सुरू केले. एवढेच नव्हे तर विद्यापीठाच्या ध्येयास सुसंगत असे तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवणारे स्वयं–साहाय्य गट बांधणी (१९९०), बालसंगोपन व रंजन शिक्षण (२००२) प्रमाणपत्र यासारखे शिक्षणक्रमही कार्यान्वित केले. शिक्षणाची गुणवत्ता वाढावी यासाठी मुख्याध्यापकांसाठी शालेय व्यवस्थापन पदविका तर माध्यमिक शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणांचे आयोजन केले. 'ज्ञानगंगा घरोघरी' पोहचवण्याच्या दृष्टीने संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात अभ्यासकेंद्रे स्थापन केली.

मुक्त विद्यापीठाची शिक्षणपद्धती दूरशिक्षणाची असते, तर ह्या विद्याशाखेत प्रवेश घेणारे विद्यार्थी सेवांतर्गत असतात. ह्याचा विचार करून शिक्षणक्रमांची व त्यातील प्रात्यक्षिकांची रचना केली. प्रत्येक प्राप्त अनुभव वास्तविक स्तरावर पडताळून पाहता यावा यासाठी विशेष प्रात्यक्षिकांचे नियोजन केले. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व तज्ज्ञांच्या मदतीने मुद्रित–अमुद्रित साहित्य तयार केले. ह्या विद्याशाखेतील शिक्षणक्रम व्यावसायिक असतात. त्याचा विचार करता अभ्यासकेंद्रांवर शिक्षणक्रमातील विशिष्ट प्रात्यक्षिके मार्गदर्शनाखालीच करता यावी, त्याचा सराव व्हावा या दृष्टीने संपर्कसत्रांचे आयोजन केले.

मुक्त विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विद्याशाखा अनेकविध पुरस्कारांनी विभूषित आहे हे सांगण्यास आम्हाला आनंद होतो. आंतरराष्ट्रीय पुरस्कारात डॉ. अनंत जोशी, मा. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना COL कडून मिळालेला जीवनगौरव पुरस्कार, श्रीमती वानखेडे स्वाती, बी. एड., एम. एड. ची विद्यार्थिनी ह्यांना COL कडून मिळालेला Award of Excellence for D.E. ह्यांचा समावेश होतो. शैक्षणिक वर्ष २०१२–१३ पासून विद्यापीठाने 'यशवाणी वेब रेडिओ' सुरू केला आहे. त्याच्या माध्यमातून अध्ययनार्थी तसेच समाजातील वेगवेगळ्या घटकांसाठी विविध विषयांवर तज्ज्ञ व्यक्तींचे व्याख्यान आयोजित केले जातात. शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे दर गुरुवारी शैक्षणिक विषयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले जाते. विद्यापीठाच्या वेबसाईटवर वेब रेडिओवर भेट दिल्यास याचा लाभ घेता येईल. तसेच येथील प्राध्यापक वर्गासही राष्ट्रीय व राज्य पातळीवरील वैयक्तिक पुरस्कार मिळालेले आहेत.

## २. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम

उद्याचे भविष्य शाळा शाळांमधून घडत आहे त्यामुळे शाळा हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे शाळेच्या व्यवस्थापनाचा विचार गांभीर्याने करणे गरजेचे आहे. हेच मर्म ओळखून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेने शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम १९९४ पासून सुरू केला. महाराष्ट्र शासनाने सदरील शिक्षणक्रमाची गरज, उपयुक्तता व महत्त्व ओळखून शैक्षणिक वर्षे २००४–०५ पासून नियुक्त होणाऱ्या उपमुख्याध्यापकांना पुढील पाच वर्षांच्या काळात सदरील शिक्षणक्रम करणे अनिवार्य केले आहे. सदरील शिक्षणक्रमाच्या माध्यमातून शाळेच्या कार्याला व विद्यार्थी विकासाला विकासात्मक दिशा मिळण्यासाठी त्यात शालेय कार्यासंबंधी वेगवेगळ्या घटकांचा समावेश शिक्षणक्रमात करण्यात आलेला आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेकडून चालविल्या जाणाऱ्या बी.एड. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी सदरील शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर विशेष गुण श्रेणीनुसार अध्ययनार्थीला प्राप्त होतात.

**शिक्षणक्रमाची उद्दिष्टे**

(१) अध्ययनार्थ्यांना व्यवस्थापनातील मूलभूत संकल्पनांचा परिचय करून देणे.
(२) अध्ययनार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक व्यवस्थापन विचारप्रवाहांची ओळख करून देणे.
(३) अध्ययनार्थ्यांना परिणामकारक व्यवस्थापनासाठी आवश्यक ते ज्ञान, अभिवृत्ती, कौशल्ये विकसित करणे.
(४) शैक्षणिक नवोपक्रम व प्रयोग करण्यासाठी अध्ययनार्थ्यांना प्रवृत्त करणे.
(५) अध्ययनार्थ्यांना व्यवस्थापनात नवीन कौशल्ये वापरण्यास प्रवृत्त करणे.
(६) अध्ययनार्थींत दैनंदिन कार्यातील समस्येकडे पाहण्याचा संशोधकाचा दृष्टिकोन वृद्धिंगत करणे आणि कृतिसंशोधन करण्यास प्रवृत्त करणे.
(७) अध्ययनार्थीला शिक्षणातील गुणवत्ता व्यवस्थापनेच्या संकल्पनेचा परिचय करून देणे.

### २.१ शिक्षणक्रमाची संरचना

| | | |
|---|---|---|
| (१) | अभ्यासक्रम | : ७ |
| (२) | कालावधी | : १ वर्ष |
| (३) | एकूण श्रेयांक | : ३२ |
| (४) | एकूण अध्ययन तास | : १००० घड्याळी तास |
| (५) | एकूण गुण | : ८०० गुण |
| (६) | संपर्कसत्र | : १० दिवस |

**अभ्यासक्रम**

(१) EDU- 199 : शैक्षणिक व्यवस्थापन : नवा दृष्टिकोन

(२) EDU- 113 : शैक्षणिक व्यवस्थापन
(३) EDU- 114 : कार्यालयीन व्यवस्थापन
(४) EDU- 115 : शालेय आर्थिक व्यवस्थापन
(५) EDU- 116 : शाळेची रचना व भौतिक सुविधा
(६) EDU- 117 : विद्यार्थी सेवा/कल्याण आणि विद्यार्थी गुणवत्ता विकास
(७) EDU- 118 : शालेय व्यवस्थापनातील मानवी संबंधांचे व्यवस्थापन

**(अ) अंतर्गत कार्य : स्वाध्याय**

**(आ) PIORES कृतिसंशोधन प्रकल्प अहवाल**

## २.२ अध्ययन पद्धती

दूरस्थ पद्धतीने अध्यापन साहित्याच्या आधारे अध्ययन–अध्यापन प्रक्रिया चालेल. त्यासाठी विद्यापीठामार्फत संपर्कसत्रे, तज्ज्ञ मार्गदर्शन, मुद्रित साहित्य, मासिक संवाद पत्रिका, इत्यादी साहित्यामार्फत अध्ययनार्थीस अभ्यास करावा लागेल. अध्ययनाची संपूर्ण जबाबदारी अध्ययनार्थीची असेल. अध्ययन साहित्याची स्वॉफ्ट कॉपी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (Ebooks : Free Download) उपलब्ध आहे. मुद्रित साहित्य मिळेपर्यंत त्याचा वापर करावा. मराठी माध्यमांचा उपयोग संपर्कसत्रे व अध्ययन–साहित्यासाठी केला जाईल. **या शिक्षणक्रमासाठी एकूण दहा दिवसांची संपर्कसत्रे अभ्यासकेंद्रावर आयोजित केली जातील. त्यापैकी ८०% उपस्थिती अनिवार्य आहे.**

### संपर्कसत्र माहिती

**(अ) उद्बोधन सत्र : (२ दिवस) (सप्टेंबर पहिला/दुसरा आठवडा) अध्ययन–साहित्य वाटप, शिक्षणक्रम,अभ्यासक्रम माहिती व परिचय, स्वाध्याय इ. माहिती**

**(आ) मुख्य संपर्कसत्र : (६ दिवस) (ऑक्टोबर/नोव्हेंबर : दिवाळी सुटी किंवा शनिवार–रविवार)**

(१) प्रथम संपर्कसत्र व उद्बोधनसत्र ह्यातील अंतर किमान १५ ते २० दिवसांचे असेल. सर्व अभ्यासक्रमाची पुस्तके हाताळावीत. त्यांचा परिचय करून घ्यावा. कृतिसंशोधन आराखडा तयार करावा.

(२) या संपर्कसत्रात तुमचा कृतिसंशोधन आराखडा पूर्णपणे तयार करून घ्यावा.

(३) हे सत्र सलग ६ दिवस किंवा शनिवार – रविवार असे सुट्टीच्या दिवसांत ३ वेळा किंवा प्रत्येक रविवारी असे ६ वेळा अध्ययनार्थी व अभ्यासकेंद्राच्या सोईनुसार रोज घड्याळी ६ तासांचे आयोजित करावे.

**(इ) अंतिम संपर्कसत्र (२ दिवस, फेब्रुवारी/मार्च)**

स्वाध्यायाचे लेखन संमंत्रकांकडे डिसेंबरमध्ये परस्पर सादर करणे. त्यावर चर्चा, सूचना, शेरे देऊन अध्ययनार्थीला ते सुधारण्यासाठी परत द्यावेत.

## २.३ प्रवेश पात्रता

१. यूजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवीधर व्यक्ती किंवा

२. मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक असे नियुक्तपत्र असलेली व्यक्ती

## प्रवेश

उमेदवाराने प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. या अर्जासोबत पुढील कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहे.

१. जन्मतारखेचा पुरावा २. पदवीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र ३. मुख्याध्यापक/उपमुख्याध्यापक असल्यास नियुक्तीचे आदेश.

विद्यापीठ शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहे. प्रत्येक केंद्रावर कमाल ६० प्रवेश देण्यात येतील. अभ्यासकेंद्रावर प्रवेश न झाल्यास किंवा अपरिहार्य कारणास्तव अभ्यासकेंद्र बंद झाल्यास विद्यापीठाने निर्धारित केलेल्या अभ्यासकेंद्रावर सदर शिक्षणक्रम पूर्ण करावा लागेल.

प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर स्कॅन केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. त्यानंतर अंतिम प्रवेश करण्यात येईल. शिक्षणक्रमाच्या पात्रतेसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे उमेदवाराने जोडणे अत्यावश्यक आहे. स्कॅन कागदपत्रे वाचनीय नसल्यास प्रवेश नाकारण्यात येईल व उमेदवाराने भरलेले विद्यापीठ शुल्क परत दिले जाणार नाही. अध्ययनार्थ्याने अभ्यासकेंद्राचे शुल्क अभ्यासकेंद्राकडे भरावे व ते भरल्याची पोच ठेवावी.

प्रवेश निश्चित झाल्यानंतर अध्ययनार्थ्यीस कायम नोंदणी क्रमांक देण्यात येईल. अभ्यासकेंद्रनिहाय पात्र अध्ययनार्थांची यादी ऑनलाईन पद्धतीने पोर्टलवर देण्यात येईल.

## २.४ शिक्षणक्रम शुल्क

| अ.क्र. | शिक्षणक्रम शुल्क | शुल्क |
|---|---|---|
| | भाग – १ | |
| १. | Registration Fee (नोंदणी शुल्क) | २०० |
| २. | Eligibility Fee (पात्रता शुल्क) | १०० |
| ३. | Identity Card Fee (ओळखपत्र शुल्क) | १० |
| ४. | Prospectus Fee (माहितीपुस्तिका शुल्क) | ५० |
| ५. | E-Suvidha/E-Services Fee (ई–सुविधा शुल्क) | ६० |
| ६. | Library Fee (ग्रंथालय शुल्क) | ०० |
| ७. | Chancellor Office Event Fee (कुलपती कार्यालय कार्यक्रम शुल्क) | ३८ |
| ८. | Sports Fee (क्रिडा शुल्क) | ५० |
| ९. | DSW Fee (बहिस्थ विद्यार्थी कल्याण शुल्क) | ५० |
| १०. | Disastar Mgt. Fee (आपत्ती व्यवस्थापन शुल्क) | ०० |
| ११. | NSS Fee (एन.एस.एस. शुल्क) | ०० |
| १२. | Alumni contribution Fee (ॲल्युमनी योगदान शुल्क) | १० |
| १३. | Sanvad Fee (संवाद पत्रिका शुल्क) | ०० |
| १४. | Convocation Fee (पदविका समारंभ शुल्क) | ३५० |
| १५. | Student Insurance Fee (विद्यार्थी विमा शुल्क) | ०० |
| | **एकूण** | **९१८** |
| | भाग – २ | |
| १६. | Tution Fees (विद्यापीठ शुल्क रु.२३२२+अभ्यासकेंद्र शुल्क रु.२७५०) | ५०७२ |
| १७. | Exam Fee (परीक्षा शुल्क) | १६२० |
| | **एकूण** | **७६९०** |

## २.५ कालावधी

शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम कालावधी किमान एक वर्ष असून जास्तीतजास्त तीन वर्षांत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर अध्ययनार्थीला नोंदणी संपेल त्या वर्षी पुन्हा त्या त्या वर्षांचे पूर्ण शुल्क भरून पुनर्नोंदणी करावी लागेल. पुनर्नोंदणी ही फक्त एकदाच करता येईल. पुनर्नोंदणी कालावधी प्रथम नोंदणी कालावधीची मुदत संपण्याच्या दिनांकापासून मोजण्यात येईल.

## २.६ माध्यम

मुक्त विद्यापीठाचे सर्व अध्ययन, अध्यापन साहित्य मराठी माध्यमात असेल. मात्र अध्ययनार्थीच्या सोईसाठी मराठी, हिंदी व इंग्रजी ह्यापैकी कोणत्याही एका भाषेत त्याला स्वाध्याय, कृतिसंशोधन अहवाल सादर करता येईल. यासाठी अभ्यासकेंद्र संचालक/समन्वयक ह्यांची लेखी परवानगी घ्यावी. अभ्यासकेंद्रावर हिंदी व इंग्रजी माध्यमातून संमंत्रण करणे बंधनकारक नाही.

## २.७ मूल्यमापन प्रक्रिया

### (१) एकूण मूल्यमापन

या शिक्षणक्रमासाठी एकूण ८०० गुणांचे मूल्यमापन असेल. त्यात अंतर्गत मूल्यमापनास २०% भारांश आणि बहिःस्थ मूल्यमापनास ८०% भारांश असेल.

| | |
|---|---|
| (क) अंतर्गत मूल्यमापन | |
| १) प्रत्येक अभ्यासक्रमावरील ४ स्वाध्याय | २० गुण |
| ७ अभ्यासक्रमावरील २८ स्वाध्याय – | १४० गुण |
| २) कृतिसंशोधन कार्य अहवाल – | ५० गुण |
| मौखीक परीक्षेद्वारे कार्यपडताळणी – | ५० गुण |
| (ख) बहिःस्थ मूल्यमापन | |
| १) अंतिम लेखी परीक्षा ८० पैकी (७ अभ्यासक्रम) | ५६० गुण |
| **एकूण** | **८०० गुण** |

### (२) कृतिसंशोधन अहवाल

कृतिसंशोधन अहवालासाठीच्या १०० गुणांपैकी २५ गुण अंतर्गत परीक्षकांनी व २५ गुण बहिःस्थ परीक्षकांनी दिलेले असतील आणि ५० गुण मौखिक परीक्षेसाठी असतील. आपण केलेले कृतिसंशोधन नवीन दृष्टिकोनानुसार लेखन करून मांडावे. साधारणपणे ९ ते १० हजार शब्दांत हे अहवाल हस्तलिखित स्वरूपात करून अभ्यासकेंद्रावर मार्चपूर्वी तीन प्रतीत सादर करावे. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात कृतिसंशोधनाचे मूल्यमापन अभ्यासकेंद्रावर करण्यात येईल. त्यावेळी तात्त्विक अभ्यासक्रमासंबंधी आपण केलेल्या स्वाध्याय कार्याची पडताळणी करण्यात येईल.

### (४) उत्तीर्णतेचे नियम

शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम यशस्वीरित्या उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक अभ्यासक्रमात आणि कृतिसंशोधनात प्रत्येकी ४०% गुण प्राप्त करणे अनिवार्य आहे.

## २.८. Academic Bank of Credits-ID तयार करण्याची सूचना

विद्यार्थी मित्रानो,

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० नुसार आपणास Academic Bank of Credits-ID तयार करणे अनिवार्य आहे. आपण प्राप्त केलेले प्रमाणपत्र, पदविका, पदवीची माहिती DigiLocker (ABC-NAD)वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी क्रेडीट ट्रान्सफर करता येणार नाही. आपणास Academic Bank of Credits-ID नोंदणी https://www.abc.gov.in/ या पोर्टलवर करता येईल किंवा आपल्या विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in या वेबसाईटला भेट द्या. या वेबसाईटवरील Student Zone या बटनाला क्लिक करा. यातील Academic Bank of Credits वर क्लिक केल्यानंतर Academic Bank of Credit-ID तयार करण्यासंबंधित माहिती व ppt सादरीकरण आपणासाठी वेबसाईटवर उपलब्ध केलेले आहे.

□□□

## ३. विभागीय केंद्रे

**(१) अमरावती :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र, व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही. अमरावती – ४४४६०४ ☎:(०७२१) २५३१४४५
फॅक्स : २५३१४४४

**(२) औरंगाबाद :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय केंद्र सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस नंदनवन कॉलनी, छावणी औरंगाबाद – ४३१ ००२
☎ : (०२४०) २३७१०७७ / २३७१०६६
फॅक्स : (०२४०) २३७१०८८

**(३) मुंबई :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र द्वारा : जगन्नाश शंकरशेठ म.न.पा.ची मराठी शाळा, दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ), नाना चौक ग्रँट रोड (प.) मुंबई – ४०० ००७
☎ : (०२२) २३८७४१८६ फॅक्स : २३८२६१३५

**(४) नागपूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण बंगला, विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कँपस, रविनगर चौक नागपूर – ४४० ००१
☎ : (०७१२) २५५३७२४
फॅक्स : २५५३७२५

**(५) नाशिक :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र, नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत, दुसरा मजला नवीन पंडित कॉलनी, नाशिक –४२२ ००२
☎ : (०२५३) २३१७०६३
फॅक्स : २५७६७५६

**(६) पुणे :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह, महापालिका शाळा क्र.५ (मुलांची), ६५४, सदाशिव पेठ हौदासमोर कुमठेकर मार्ग, पुणे –४११ ०३०
☎ : (०२०) २४४९११०७
फॅक्स : २४४५७९१४

**(७) कोल्हापूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफीसजवळ विद्यानगर,कोल्हापूर – ४१६ ००४
☎ : (०२३१) २६०७०२२
फॅक्स : २६०७०२३

**(८) नांदेड :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ क्रीडा इमारत नांदेड – ४२१ ६०६
☎ : (०२४६२) २२९९४०
फॅक्स :०२४६२–२२९९५०

## ४. संपर्कासाठी पत्ते

अध्ययनार्थींनी लेखी पत्रव्यवहार अभ्यासकेंद्रामार्फत पोस्टाने करावा.

**(१) माहितीपुस्तिका, शिक्षणक्रम अभ्यासकेंद्रांची यादी व प्रवेश–अर्ज**

(अ) माहितीपुस्तिका व अभ्यासकेंद्र

शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम माहितीपुस्तिका व अभ्यासकेंद्र यादी विद्यापीठ संकेत स्थळावर उपलब्ध आहे. (वेबसाईट ycmou.digitaluniversity.ac.)

**(२) अभ्यासक्रमातील शैक्षणिक अडचणी**

डॉ. कविता साळुंके
प्रभारी संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
नाशिक – ४२२ २२२.
दूरध्वनी : ०२५३–२२३१४७२

**(३) समन्वयक विकसन व प्रवर्तन**

डॉ. सुभाष सोनुने
सहायक प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
नाशिक – ४२२ २२२.
दूरध्वनी : ०२५३–२२३१४७२

**(६) पुस्तके, अध्ययन–साहित्य, इत्यादी**

भांडार व्यवस्थापक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक–४२२ २२२.
दूरध्वनी : ०२५३–२२३०१०७,

**(७) परीक्षा अर्ज, परीक्षा क्रमांक, निकाल, पदवी प्रमाणपत्र, इ.**

परीक्षा नियंत्रक / उपकुलसचिव, परीक्षा कक्ष, युनिट – १
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक–४२२ २२२.
दूरध्वनी : ०२५३–२२३०७१६

**(८) नोंदणी संदर्भातील अडचणी**

प्रमुख नोंदणी कक्ष
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक–४२२ २२२.
दूरध्वनी : ०२५३–२२३०७१६

## परिशिष्ट ५.१ : University Grants Commission Resolution (2004)

विश्वविद्यालय अनुदान आयोग
बहादुरशाह जाफर मार्ग
नई दिल्ली-११० ००२
**UNIVERSITY GRANTS COMMISSION**
**BAHADURSHAH ZAFAR MARG**
**NEW DELHI-110002**

F1-52/2000(CPP-II) 5 MAY 2004

The Registrar / Director
Of all the Indian Universities
(Deemed, State, Central Universities /
Institutions of National importance)

Subject : Recognition of Degrees awarded by Open Universities.

Sir/Madam,

There are a number of open Universities in the country offering various degrees/diploma through the mode of non-formal education. **The Open Universities have been established in the country by an Act of Parliament or State Legislature in accordance with the provisions contained in Section 2(f) of University Grants Commission Act, 1956. These universities are, therefore, empowered to award degrees in terms of Section 22(1) of the UGC Act, 1956.**

A circular was earlier issued vide UGC letter N.F.1-8/92(CPP) dated February, 1992 mentioning that the Certificate, Diplomas and Degrees awarded by Indira Gandhi National Open University are to be treated equivalent to the corresponding awards of the Universities in the country.

Attention is further invited to UGC circular No.F1-25/93(CPP-II) dated 28th July, 1993 (copy enclosed) for recognition of degrees and diplomas as well as transfer of credit for courses successfully completed by students between the two types of universities so that the mobility of students from Open University stream to traditional Universities is ensured without any difficulty.

The UGC has specified the nomenclature of degrees under Section 22(3) of the UGC Act, 1956 to ensure mandatory requirements viz. minimum essential academic inputs required for awarding such degrees. A copy of Gazette Notification regarding specification of degrees issued vide No.1-52/97(CPP-II) dated 31st January 2004 is enclosed. The details are also given in UGC Web site : www.ugc.ac.in

**May, I therefore request you to treat the Degrees / Diploma / Certificates awarded by the Open Universities in conformity with the UGC notification on Specification of Degrees as equivalent to the corresponding awards of the traditional Universities in the country.**

Yours faithfully

**(Dr. Mrs. Pankaj Mittal)**
**Joint Secretary**

**Encl. : As Above**
**Copy to :**

1. The Secretary, Government of India, Ministry of Human Resource Development, Department of Secondary Education and Higher Education, Shastri Bhavan, New Delhi-110001.
2. The Secretary, All Indian Council for Technical Education, I.G. Sports Complex, Indraprastha Estate, New Delhi
3. The Secretary, Association of Indian Universities (AIU), 16, Comrade Inderjit Gupta Marg, New Delhi -110002.
4. The Secretary, National Council for Teacher Education, I.G. Stadium, I. P. Estate, New Delhi-110002.
5. The Director of Distance Education Council, IGNOU Campus, Maidan Garhi, New Delhi-110068.
6. The Vice-Chancellor, Indira Gandhi National Open University, Maidan Garhi, New Delhi-110068.
7. The Vice-Chancellor, Dr. B. R. Ambedkar Open University, Road, No. 46, Jubilee Hills, Hyderabad (AP)
8. The Vice-Chancellor, Nalanda Open University, West Gandhi Maidan, Patna-800001 (Bihar)
9. The Vice-Chancellor, Dr. Babasaheb Ambedkar Open University, Shahigaug, Ahmedabad-380003 (Gujarat)
10. The Vice-Chancellor, Karnataka State Open University, Manasagangotri, Mysore-570006 (Karnataka)
11. The Vice-Chancellor, Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik-422222 (Maharashtra)
12. The Vice-Chancellor, Kota Open University, Vardhaman Mahaveer Open University, Kota-324010 (Rajasthan)
13. The Vice-Chancellor, Netaji Subhash Open University, Kolkata-700020 (West Bengal)
14. The Vice-Chancellor, Madhya Pradesh Bhoj (Open) University, Bhopal-462016 (M.P.)

**(V.K. Jaiswal)**
**Under Secretary**

# परिशिष्ट ५.२ : मुख्याध्यापक व उप मुख्याध्यापक पदावरील पदोन्नतीसाठी महाराष्ट्र शासन निर्णय (२००५)

**मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक पदावर पदोन्नतीसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी शाळांतील अर्हताप्राप्त शिक्षकांना लागू करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक :– एसएसएन/२६९८/११७९२/(१४०/९८) माशी–२

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०००३२,

दिनांक :– १३ जून २००५

पाहावे :– (१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे पत्र क्र :– यचममुवि/कु/१२८४, दि. २–८–२०००.

(२) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र. :– मराशैसंप्रप/राशिप्रमं /शाव्यप/२००१/३६३३, दि.१५–१२–२००१

(३) शिक्षण संचालनालयाचे (माध्य. व उच्च माध्य.) पत्र क्र.:– अमाशा/४१९९/३८९९४ /क, दि. २ मार्च,२००२

**प्रस्तावना :–** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने महाराष्ट्रातील माध्यमिक स्तरावरील मुख्याध्यापक पदावर काम करताना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन अत्यंत निकडीची गरज म्हणून सन १९९४ मध्ये **शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम** हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. आतापर्यंत ज्यांनी शालेय व्यवस्थापन शिक्षणक्रम पूर्ण केला आहे त्यांना शालेय स्तरावरील दैनंदिन व्यवस्थापन व प्रशासन कुशलपणे हाताळण्यासाठी सदर अभ्यासक्रम फारच उपयुक्त ठरत असल्याचे आढळून येत आहे.

सध्याच्या नियमावलीत शिक्षकांना मुख्याध्यापक पदावर पदोन्नती देताना विशिष्ट अभ्यासक्रम पूर्ण करण्याची कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे अननुभवी व व्यवस्थापन शास्त्राचे ज्ञान नसलेले शिक्षक मुख्याध्यापकपदी पदोन्नत झाल्याने प्रशासनावर त्यांची पकड राहत नाही, ही वस्तुस्थिती आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता पदोन्नतीपूर्वी शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम ह्या अभ्यासक्रमाची नितांत आवश्यकता आहे. यास्तव राज्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळांतील उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापकांना सदर अभ्यासक्रम बंधनकारक करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :–** शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबरोबरच शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचावणे हेही शासनाचे उद्दिष्ट आहे. या दृष्टिकोनातून राज्यातील मान्यताप्राप्त प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापकांना त्यांची जबाबदारी अधिक चांगल्या रितीने पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने तयार केलेला व त्यांच्या मार्फतच पत्रद्वारा राबविण्यात येणारा एक वर्षाचा **शालेय व्यवस्थापन पदविका** अभ्यासक्रम पूर्ण करणे बंधनकारक करण्यात येत आहे. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्षे २००४–०५ पासून नियुक्त होणाऱ्या उपमुख्याध्यापकांना पुढील ५ वर्षांत पूर्ण करणे आवश्यक राहील. शालेय व्यवस्थापन अभ्यासक्रमाकरिता सदर विद्यापीठातर्फे रु.१०००/–इतके शुल्क आकारण्यात येणार असून याची प्रतिपूर्ती वेतनेतर अनुदानातून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

भविष्यात उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापक पदावर पदोन्नतीस पात्र ठरणाऱ्या तसेच भविष्यात सदर पदावर नियुक्त होणाऱ्या अर्हताप्राप्त शिक्षकांनी हा अभ्यासक्रम स्वखर्चाने पूर्ण करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

**स्वाक्षरी**
**(सु. अ. साळवे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

- शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
- संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य.च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
- संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
- संचालक, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, पुणे
- संचालक, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद
- सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद/सर्व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई
- महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर
- सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व अधीक्षक, वेतनपथके(माध्यमिक)
- वित्त विभाग, नियोजन विभाग, सामान्य प्रशासन विभाग, ग्रामविकास विभाग,मंत्रालय, मुंबई
- आदिवासी विकास विभाग, मंत्रालय , मुंबई
- निवड नस्ती
- शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
- संचालक,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
- अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्य मंडळ) पुणे
- शिक्षण संचालक(प्रौढ), महाराष्ट्र राज्य, पुणे
- संचालक, शासकीय परीक्षा मंडळ, पुणे
- सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
- महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
- सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद

**मुख्याध्यापक व उप मुख्याध्यापक पदावरील पदोन्नतीस यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी शाळातील अर्हताप्राप्त शिक्षकांना लागू करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्र.डब्ल्यूपीटी ३५०७/प्र.क्र.०५/आस्था-१०.
मंत्रालय,मुंबई-३२, दिनांक - १ फेब्रुवारी,२००८.

**वाचा :-** शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.एसएसएन २६९८/११७९२/(१४०/९८) माशि-२,दिनांक १३ जून,२००५.

**शासन निर्णय**

संदर्भाधीन शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १३ जून,२००५ च्या शासन निर्णयान्वये, शिक्षणाच्या सार्वत्रिकरणा बरोबरच शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचावणे या दृष्टीकोनातून राज्यातील मान्यताप्राप्त प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यायालयातील उप मुख्याध्यापक व मुख्याध्यापकांना त्यांची जबाबदारी अधिक चांगल्या रितीने पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाने तयार केलेला व त्यांच्या मार्फतच पत्राव्दारे राबविण्यात येणारा एक वर्षाचा शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम पूर्ण करणे बंधनकारक करण्यांत येत आहे असा निर्णय घेण्यात आला आहे. तो जिल्हा परिषदेला लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. त्यानुसार उपरोक्त निर्णय महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियम १९६१ मधील कलम २४८ अन्वये योग्य त्या फेरफारासह सर्व जिल्हा परिषदांना/जिल्हा परिषदांतील प्राथमिक,माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यायालयांना लागू करण्यांत येत आहे.

३. याबाबत सेवाप्रवेश नियमात यथावकाश दुरुस्ती करण्यात येत आहे. तोपर्यंत जिल्हा परिषदांनी सदर शासन निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी करावी.

हे परिपत्रक संगणक संकेतांक २००८०१३११३२९४३००१ अन्वये शासनाच्या वेबसाईटवर www.maharashtra.gov.in.वर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
( मोहम्मद हुसेन मुजावर )
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति,
सचिव,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग (माशि-२) मंत्रालय,मुंबई-३२.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
शिक्षणाधिकारी,सर्व जिल्हा परिषदा

## मुक्त विद्यापीठाच्या पदव्यांना समकक्षता व शासनमान्यता

**(१) अन्य विद्यापीठांच्या पदवीशी समकक्षता**

मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्या पत्र क्र. समक (उ. शि.)/१०९४/३२८६१/मवि-१, दि. ३० ऑक्टोबर १९९५ च्या पत्रान्वये 'केंद्रीय किंवा राज्य विधिमंडळाने अधिनियमाद्वारे भारतातील विद्यापीठाने दिलेली पदवी/पदविका आणि संसदेने अधिनियमाद्वारे इतर शैक्षणिक संस्था प्रस्तावित केलेल्या आहेत किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम (१९५६) मधील कलम क्र. ३ अन्वये मानीव विद्यापीठे घोषित केली आहेत अशांच्या बाबतीत पदवी किंवा पदविका मान्यता देण्याबाबतचे औपचारिक आदेश विद्यापीठाने काढण्याची आवश्यकता नाही'.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाने अधिनियमाद्वारे (कायदा क्र. २०/१९८९) स्थापन केलेले विद्यापीठ असून त्यास विद्यापीठ अनुदान आयोगाचीही मान्यता आहे. **त्यामुळे या विद्यापीठाची पदवी इतर विद्यापीठांच्या पदवीशी समकक्ष आहे.**

**(२) विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांचे पत्र क्र. F/S-15/89 (CPP-I) दि. ८ डिसेंबर १९९२ नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९५६ च्या कायद्यातील कलम १२-बी अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास मान्यता दिली आहे.

**(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता**

उपसचिव व परीक्षा नियंत्रक, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्या पत्र क्र. १४७७ (१७/१९९४/कक्ष) **दि. १७ फेब्रुवारी १९९४ च्या पत्रातील मान्यतेसंबंधीचा मजकूर – 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे संविधिमान्य (Statutory) असल्यामुळे आपल्या विद्यापीठाच्या पदवीधर विद्यार्थ्यांकडून आलेले अर्ज देखील इतर मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवीधर उमेदवारांकडून आलेल्या अर्जांप्रमाणेच आयोगाकडून विचारात घेतले जातील'**

## मुक्त विद्यापीठाच्या पदवी/पदविकांना महाराष्ट्र शासन मान्यता

विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेली विद्यापीठे

राज्य सेवेतील पदासांठी पदवी/पदविकास मान्यता

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

**शासन निर्णय** : क्रमांक आरजीडी-१३९४/प्र.क्र. २१/९४/१३,मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ८ मार्च १९९५

**वाचा** : (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरजीडी-१०६१/१८९६७/११४ - जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९

**शासन निर्णय** : महाराष्ट्र लोक सेवा आयोगाशी विचार विनिमय करून उपरोक्त दिनांक २१ ऑगस्ट १९६९ च्या आदेशाद्वारे असा निर्णय घेण्यात आला होता की, केंद्र अथवा राज्य विधिमंडळाच्या अधिनियमाद्वारे स्थापित झालेली विद्यापीठे, संसदेच्या अधिनियमाद्वारे स्थापन झालेल्या इतर शैक्षणिक संस्था, किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ च्या अंतर्गत भाग ३ अन्वये जाहीर झालेली मानवी विद्यापीठे यांनी प्रदान केलेल्या पदव्या / पदविका तसेच भारतीय वैद्यकीय मंडळ अधिनियम, १९५६ च्या परिशिष्टांमध्ये अंतर्भूत केलेल्या वैद्यकीय व संलग्न विषयामधील पदव्या यांना शासकीय महाविद्यालयातील अध्यापकीय पदे वगळता, **राज्यातील सेवा व पदांवरील भरतीसाठी आपोआप मान्यता प्राप्त झाली असल्याचे समजण्यात यावे.**

(२) सदर आदेशासोबत विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या वैधानिक विद्यापीठे व संस्थांची यादी जोडण्यात आली होती. आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे व संस्था यांची अद्ययावत यादी आता या आदेशासोबत जोडण्यात आली आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरजीडी - १०६१/१८९६७/११४/जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९ मध्ये नमूद केलेल्या आणि वर परिच्छेद १ मध्ये उद्धृत केलेल्या हेतूसाठी सदर सर्व विद्यापीठे/संस्था यांनी प्रदान केलेल्या पदवी/पदविकांना आपोआप मान्यता देण्यात आल्याचे समजण्यात यावे.

महाराष्ट्रचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

दा. र. राणे


अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) राज्यपालांचे सचिव
(२) मुख्य मंत्र्यांचे सचिव
(३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
(४) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
(५) महालेखापाल, महाराष्ट्र -२, मुंबई
(६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
(७) अभिदान व लेखा अधिकारी, मुंबई
(८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई
(९) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
(१०) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
(११) सर्व मंत्रालयीन शिक्षण
(१२) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
(१३) अवर सचिव, भारत सरकार, शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली
(१४) निवड नस्ती

**वाचा :महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त शासन निर्णय क्रमांक आर.जी.डी. १३९४/प्र.क्र.२१/९४/१३ मंत्रालय, मुंबई. दिनांक ८ मार्च १९९५ च्या सोबत जोडलेल्या यादीमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांची अनुक्रमांक १४६ वर नोंद करण्यात आलेली आहे.**

## विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।
ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १ ।।
नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।
हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

*कुसुमाग्रज*


### निर्मिती

श्री. विलास बधान
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२


© २०२३, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक


- **प्रथम प्रकाशन :** जुन २०२३
- **अक्षरजुळणी :** ओम कॉम्प्युटर्स, नाशिक – ४२२ ०१२
- **प्रकाशक :** कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

**NB23-24-29**